सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२६०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd fl oor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915

माझगांव कार्यालय

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव,मुंबई ४००२०३ २३७८९७०१/०४/०५/०६/०८ फॅक्स : २३७८१०६१

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 :23789701/04/05/06/08 Fax : 23781061

ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mahaonline.gov.in

### दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथमवर्ग) (पूर्व) परीक्षा -२०१४

**जाहिरात क्रमांक : ६५ /२०१४ क्रमांक १९(१)/ १५४६ /२०१४/बारा**

**दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथमवर्ग) (पूर्व) परीक्षा -२०१४** ही शनिवार, **दिनांक ७ जून, २०१४** रोजी औरंगाबाद, मुंबई व नागपूर या जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल. प्रस्तुत जाहितीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या :-** २२४

**३.** वेतनश्रेणी :- रु. २७,७०० – ४४,७७० अधिक नियमानुसार देय भत्ते.

**४. पात्रतेच्या अटी :- वयोमर्यादा आणि अर्हता –**

**४.१ वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता यांचेकरिता :-**

**४.१.१ वयोमर्यादा :-** दि. १ जून, २०१४ रोजी २१ वर्षापेक्षा कमी आणि ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४.१.२ अर्हता :-** (१) विधी शाखेतील पदवी आणि उच्च न्यायालयातील किंवा त्यास दुय्यम असलेल्या न्यायालयातील दिनांक २६ फेब्रूवारी , २०१४ रोजी वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता म्हणून किमान ३ वर्षांचा वकिली व्यवसाय.

(२ ) पब्लिक प्रॉसिक्युटर या पदावरील महाराष्ट्रातील सेवा न्यायालयीन व्यवसाय म्हणून समजली जाईल/ **किंवा**

**४.२ नवीन विधी पदवीधरांकरिता :-**

**४.२.१ वयोमर्यादा :-** दि. १ जून, २०१४ रोजी २१ वर्षापेक्षा कमी आणि २५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४.२.२ अर्हता :-** (१) विधी शाखेतील पदवी. सदर पदवी प्राप्त करण्यासाठी घेण्यात येणारी प्रत्येक परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करुन पदवी प्राप्त केली असली पाहिजे **आणि**

(२ ) विधी पदवीचे अंतिम वर्ष किंवा विधीमधील पदव्युत्तर पदवीचे अंतिम वर्ष (L.L.M.) किमान ५५ % इतक्या गुणांनी दिनांक २६ फेब्रूवारी , २०१४ रोजी वा पूर्वी उत्तीर्ण असणे आवश्यक **किंवा**

४.३ उच्च न्यायालयाच्या लिपिकवर्गीय कर्मचारी वर्गाचे सदस्य **किंवा**

४.४ उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयाच्या लिपिकवर्गीय कर्मचारी वर्गाचे सदस्य **किंवा**

४.५ मंत्रालयाच्या विधी व न्याय विभागाच्या विधी विभागामध्ये विधी सहायक वा त्यापेक्षा वरिष्ठ म्हणून काम करणा-या कर्मचारी वर्गाचे सदस्य **किंवा**

४.६ उच्च न्यायालय, शहर दिवाणी न्यायालय आणि जिल्हा न्यायालये यामधील सरकारी वकिलांच्या कार्यालयातील लिपिकवर्गीय कर्मचारी वर्गाचे सदस्य.

**४.७ उपरोक्त ४.३, ४.४, ४.५ व ४.६ यांचेकरिता वयोमर्यादा :-** दि. १ जून , २०१४ रोजी उमेदवाराचे वय २१ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. तथापि, विधी पदवी प्राप्तीनंतर दि. २६ फेब्रूवारी , २०१४ पर्यंत त्यांनी किमान ३ वर्षांची सेवा केलेली असणे आवश्यक आहे.

४.८ (१) मागासवर्गीय उमेदवारांबाबत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

(२) दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च, १९७१ या कालावधीत तत्कालीन पूर्व पाकिस्तानातून स्थलांतरीत झालेले लोक, दिनांक १ नोव्हेंबर, १९६४ नंतर श्रीलंकेतून भारतात स्थलांतरीत झालेले मूळ भारतीय आणि १ जून, १९६३ नंतर ब्रम्हदेशातून भारतात स्थलांतरीत झालेले मूळ भारतीयांच्या बाबतीत वयोमर्यादा ३ वर्षाने शिथिलक्षम.

**४.९ अंध उमेदवार सदर पदासाठी अपात्र आहेत.**

**५. मराठी भाषेचे ज्ञान :-**

**५.१** प्रस्तुत पदासाठी उपरोक्त सर्व गटातील उमेदवाराला मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, वाचता व लिहिता येणे आवश्यक असून मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान त्याचप्रमाणे मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत सफाईदारपणे भाषांतर करता येणे आवश्यक आहे.

**५.२** वरीलप्रमाणे मराठी भाषेच्या ज्ञानाबददलचे प्रमाणपत्र खालील प्राधीका-यांकडून प्राप्त करणे आवश्यक आहे **:-**

(१) वकिल, ॲटर्नी किंवा अधिवक्ता यांचेबाबतीत- संबंधित जिल्हयाचे मुख्य न्यायाधीश.

(२) नवीन विधी पदवीधरांबाबतीत – विधी अभ्यासक्रमासाठी (LLB/LLM ) प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा महाविद्यालय किंवा विद्यापीठाचे विभागप्रमुख.

(३) उच्च न्यायालय आणि त्यास दुय्यम न्यायालये, मंत्रालय इत्यादी विभागातील कर्मचारी वर्गाच्या सदस्यांच्या बाबतीत – ज्याच्या नियंत्रणाखाली सेवेत आहे अशा विभाग / कार्यालय प्रमुख.

(४) विशेष परिस्थितीत पुनर्नियुक्त/ सेवानिवृत्त दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर )

**५.३** उमेदवाराने शासनाच्या नियमानुसार नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**६. परीक्षेचे टप्पे :-**

**६.१ सदर परीक्षा खालील तीन टप्प्यात घेण्यात येईल :-** (१) पूर्व परीक्षा (२) मुख्य परीक्षा (३) मुलाखत

**६.२ पूर्व परीक्षा :-** प्रस्तुत परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची आणि १०० गुणांची असेल व परीक्षेचे माध्यम इंग्रजी असेल.

**६.२.१ पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम :-** (१ ) कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर (२) सिव्हिल प्रोसिजर कोड (३) इव्हिडन्स ॲक्ट (४) ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट (५) स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट (६) महाराष्ट्र रेन्ट कन्ट्रोल ॲक्ट (७ ) लिमिटेशन ॲक्ट (८ ) कॉन्स्टिटयुशन ऑफ इंडिया (९) इंडियन पिनल कोड (१०) लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट, सेल ऑफ गुडस ॲक्ट ॲन्ड पार्टनरशिप ॲक्ट.

६.२.२ पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या उद्येशाने घेण्यात येईल. गुणवत्तेनुसार एकूण पदसंख्येच्या साधारणपणे दहा पट उमेदवार मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरविण्यात येतील. सदर पूर्व परीक्षा ही चाळणी परीक्षा असल्याने पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच ते उमेदवारांनाही कळविले जाणार नाहीत.

**६.३ मुख्य परीक्षा** :-

६.३.१ मुख्य लेखी परीक्षा एकूण २०० गुणांची असेल. सदर परीक्षेस प्रत्येकी १०० गुणांचे दोन पेपर राहतील. परीक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी असेल.

६.३.२ मुख्य परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुलाखतीस बोलविण्यात येईल. प्रत्येक विषयात किमान ५० गुण मिळवणारे उमेदवार मुलाखतीस पात्र ठरतील.

६.३.३ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती उमेदवारांच्या बाबतीत प्रत्येक विषयात किमान ४५ गुण मिळवणारे उमेदवार मुलाखतीस पात्र ठरतील.

**६.४ मुलाखत – ५० गुण** :- मुलाखतीत किमान ४० % गुण प्राप्त करणा-या उमेदवारांचा अंतिम निवडीसाठी विचार होईल.

६.५ लेखी मुख्य परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

७. लेखी परीक्षेच्या कालावधीत नक्कल किंवा गैरवर्तणूक केलेल्या किंवा फौजदारी केसेसमध्ये शिक्षा झालेल्या किंवा न्यायिक सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या / काढून टाकलेल्या किंवा बडतर्फ केलेल्या किंवा न्यायिक सेवेचा प्रशिक्षण कालावधी यशस्वीरित्या पूर्ण न करणारा उमेदवार प्रस्तुत स्पर्धापरीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरविला जाणार नाही.

८. प्रस्तुत जाहिरातीच्या दिनांकापर्यंत संपादन केलेली अर्हता व अनुभव सदर पदासाठी पात्रता व पुढील निवडीसाठी विचारात घेण्यात येईल. सक्षम विद्यापीठाकडून संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर झाल्याच्या दिनांकास शैक्षणिक अर्हता संपादन केली आहे असे समजले जाईल.

९. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर ) व न्यायदंडाधिकारी (प्रथमवर्ग ) म्हणून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्यावेळी सदर पदावर तीन वर्षे कार्यरत रहाणार आहे, याबाबतचे रु. २,००,०००/- (रु. दोन लाख ) एवढया रकमेचे बंधपत्र लिहून देणे आवश्यक राहील.

१०. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रीया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत उमेदवारांना सर्वसाधारण सूचना तसेच परीक्षा या विभागातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथमवर्ग) परीक्षा अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे उमेदवारांनी कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**११. शुल्क : ११.१ :- अ**मागास - **रु. २६५**/- ११.२ :- मागासवर्गीय - **रु. १४०**/- ११.३ **:- माजी सैनिक रु. १५**/-

**१२. अर्ज करण्याची पद्धत** :-

**१२.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत..

**१२.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based)ऑनलाईन अर्ज www.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २६ फेब्रूवारी, २०१४ ते दिनांक १८ मार्च , २०१४** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**१२.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१२.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१२.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड. (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

**१२.६** www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायंतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलबध आहे.

**१२.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील माझे खाते या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ' **Unpaid** ' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) **" Pay Now "** या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**१२.८** प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१३.** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१४.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशिल दिलेला आहे. पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती , अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया,परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत उमेदवारांना सर्वसाधारण सूचना तसेच परीक्षा विभागातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी परीक्षा मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल. सदर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in व www.mahaonline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

१५. उमेदवारांनी विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक १८ मार्च, २०१४ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१६.** चलनाद्वारे **परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास** भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक १९ मार्च, २०१४** पर्यंत बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा **शुल्क** भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा **शुल्काचा** परतावाही केला जाणार नाही.

**१७. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथमवर्ग) (पूर्व) परीक्षेचा अभ्यासक्रम** आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : **२६ फेब्रूवारी** , **२०१४**.

**श्री. शं. पाठक**
**उप**सचिव,**म**हाराष्ट्र लोकसेवा आयोग.